कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/कविवि/कला.प//२०२५-२६/१९२४
दि.१८/०२/२०२६

# कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमी आयोजित ५० व्या राज्यस्तरीय आर्टिस्ट विभागातील स्पर्धात्मक कलाप्रदर्शनाचा निकाल जाहीर करण्यात आला असून पेंटिंग व ग्राफीक प्रिंट विभागातून **सचिन नाईक**, **प्रकाश बाबनी गांवकर** व **सिध्दान कुंडईकर** यांची तर अप्लाईड आर्ट व ग्राफीक डिझाइनमधून **सज्जन भाटकर**, **राजतिलक नाईक** व **विश्वम विलास शेटकर** तसेच स्कल्पचर विभागातून **रोहिल सातोडकर**, **रक्षा नाईक** व **नवसो परवार** यांच्या कलाकृतींना प्रत्येकी २0,000/- रुपयांचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

**श्री. हनुमान कांबळी**, **श्रीमती रोहिणी काकोडे** व **श्री. साईनाथ पडते** या तज्ञांचा समावेश असलेल्या परीक्षक मंडळाने राज्यकला प्रदर्शनासाठी आलेल्या कलाकृतींचे समग्र मूल्यमापन करुन सविस्तर निकाल दिला आहे.

सदर कलाप्रदर्शनासाठी पेंटिंग व ग्राफीक प्रिंट, अप्लाईड आर्ट व ग्राफीक डिझाइन तसेच स्कल्पचर विभागातून एकूण **१५७** कलाकृती आल्या होत्या. त्यामधून **९६** कलाकृतींची प्रदर्शनात प्रदर्शित करण्यासाठी निवड झाली आहे. सदर प्रदर्शनाचे उद्घाटन कला अकादमीचे सन्माननीय अध्यक्ष श्री. चंद्रकांत उर्फ बाबू कवळेकर यांच्याहस्ते दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी सायं. ५.00 वाजता कला अकादमीच्या कला दालनात(आर्ट गॅलरी) आयोजित करण्यात आले आहे.

पारितोषिक प्राप्त सर्व कलाकारांचे कला अकादमीतर्फे अभिनंदन करण्यात आले असून पारितोषिक वितरणाची तारीख मागाहून जाहिर करण्यात येणार आहे. याची सर्व संबधितानी नोंद घ्यावी.

सदर प्रदर्शन दि. १ मार्च २०२६ पर्यंत सकाळी १०.०० ते सायं. ७.०० पर्यंत कलारसिकांसाठी खुले राहील. सर्व कलाप्रेमी रसिकांनी आवर्जून उपस्थिती लावावी असे कला अकादमीतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

सोबतः- पुरस्कार प्राप्त कलाकारांचे फोटो.

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)